**महाराष्ट्र न्यायिक अकादमी आणि भारतीय मध्यस्थी केंद्र व प्रशिक्षण संस्था**
**उत्तन–गोराई रोड, उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे – ४०१ १०६.**
**दूरध्वनी क्र.: ८४३३९९०१०१ ई–मेल :– mjauttsc@aij.gov.in**

जा.क्र.मन्याअ/उत्तन/1797/२०२५ दिनांक : ५/१२/२०२५

## दरपत्रक निवेदन

मंजूर 'कार्यकारणी ठरावानुसार' अकादमीतील नवीन लॉन येथे दक्षिण व पश्चिम बाजुस सुरक्षा कुंपणाचे काम करायचे आहे. तरी इच्छुक कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यासाठी लागणारे साहित्य आणि मजुरीचे दरपत्रक बंद पाकीटातून उपसंचालकांच्या कार्यालयामध्ये दि. १२.१२.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**अटी व शर्ती :–**

१. संबंधीत कंत्राटदार यांनी स्वत:च्या लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर 'अकादमीतील नवीन लॉन येथे सुरक्षा भिंतीचे बांधकाम' असे नमूद करावे. सदरचे दरपत्रक 'महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन – गोराई रोड, उत्तन, भाईंदर पश्चिम – ४०११०६' या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्षात येउन कार्यालयामध्ये दि. १२.१२.२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाही.

२. कुंपण करणेसाठी कोणते साहित्य वापरणार आहे आणि त्याची रचना कशा प्रकारची असणार आहे याचा आराखडा अकादमीस दाखवूनच अंतिम करून घ्यावा. अकादमीने मंजुर केलेले साहित्य आणि आराखडा या प्रमाणे दरपत्रक सादर करावे

३. दरपत्रकामध्ये वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख करावा.

४. दरपत्रकांमध्ये येणे जाण्याचा खर्च तसेच सामान आणण्याचा खर्च आवश्यकता असल्यास स्पष्टपणे नमुद करावा.

५. दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार कार्यालयीन प्रमूखास राहिल.

६. दर नमुद करताना स्वत: मोजणी करून कामाचे एकूण क्षेत्र चौरसफुट याप्रमाणात तसेच प्रती चौरसफुट साहित्य व मजुरी याचा स्पष्ट उल्लेख दरपत्रकात करावा.

७. जागेची पाहणी व मोजणी सकाळी ९.३० ते दुपारी ४.३० या दरम्यान करता येईल. (गुरूवार साप्ताहिक सुट्टीचा दिवस सोडून.)

**दिनांक : ०५/१२/२०२५**

Ushukla 5/12/25
**(उदय बा शुक्ल)**
**सहसंचालक**
**महाराष्ट्र न्यायिक अकादमी व**
**भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था**